# भाषा संचालनालय,
## विभागीय कार्यालय, पुणे
नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१.

दूरध्वनी क्रमांक :- ०२०-२६१२१७०९ ईमेल- bhashapune@gmail.com


क्र.आस्था मटंप /११/२०२५/९६१

दिनांक : ३०.९.२०२५

**संबंधित कार्यालय**

विषय :- भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी मराठी टंकलेखन परीक्षा -**१४ ऑक्टोबर २०२५** परीक्षेची कार्यक्रमपत्रिका, आसन क्रमांक व वेळापत्रक इत्यादीची माहिती संबंधित कार्यालयांना पाठवण्याबाबत.

महोदय,

भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी ३० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी टंकलेखन परीक्षा (संगणकावर) मंगळवार **दि.१४ ऑक्टोबर २०२५** रोजी पुणे या केंद्रावर सकाळी ठीक ९.३० वाजल्यापासून घेण्यात येणार आहे. परीक्षा केंद्र, परीक्षाचालक-नि-ज्येष्ठ पर्यवेक्षकाचे नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक व परीक्षेचे वेळापत्रक तसेच परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांसाठी सूचना इत्यादी माहिती पुढील कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

२. संगणकावर टंकलेखन करण्यासाठी संगणकामध्ये **आयएसएम सॉफ्टवेअर** इन्स्टॉल करण्यात आले आहे. त्यामध्ये DVOT-TTSurekhMR या फॉन्टमध्ये टंकलेखन करावयाचे आहे. याचा कळफलक मराठी टंकलेखन यंत्राप्रमाणे असेल. तसेच विभाग २ च्या प्रश्नपत्रिकेची वेळ ६० मिनिटे इतकी करण्यात आली आहे. याची माहितीही संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यात यावी.

३. आपल्या कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्यांना या परीक्षेस प्रवेश दिलेला आहे त्यांची नावे, आसन क्रमांक व परीक्षेचे वेळापत्रक यासंबंधीची माहिती दर्शविणारी विवरणपत्रे सोबत जोडली आहेत. आपल्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या परीक्षेचा निश्चित दिवस, आसन क्रमांक, वेळापत्रक याबाबतची माहिती तात्काळ देण्याची कृपया व्यवस्था करावी व सदर माहिती मिळाल्याबद्दल संबंधितांची सही घ्यावी. आपल्या कार्यालयातील एखाद्या कर्मचाऱ्याची दरम्यानच्या काळात अन्य ठिकाणी बदली झाली असेल अगर एखादा कर्मचारी रजेवर गेला असेल तर परीक्षेची सर्व माहिती त्याला परीक्षेपूर्वी कळविण्याची व्यवस्था तात्काळ करावी व तसे केल्याचे या कार्यालयास उलटटपाली कळवावे.

४. या परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांना निश्चितपणे ओळखता यावे म्हणून परीक्षेचा ओळखपत्राचा विहित नमुना सोबत जोडला आहे. हे ओळखपत्र संबंधित कर्मचाऱ्याकडून भरून घ्यावे व त्यावर जबाबदार अधिकाऱ्याने (असा अधिकारी राजपत्रित असावा) स्वाक्षरी करणे जरुरीचे आहे. सदर ओळखपत्र तसेच कार्यालयाने त्यांना दिलेले छायाचित्र (फोटो) असलेले त्यांचे ओळखपत्र (आयकार्ड) परीक्षाचालकांनी मागणी करताच त्यांना दाखवणे आवश्यक आहे. ज्या उमेदवाराकडे त्यांचे छायाचित्र (फोटो) असलेले ओळखपत्र नसेल त्याने परीक्षेच्या ओळखपत्रावर फोटो चिकटवून तो कार्यालयप्रमुखांकडून साक्षांकित करून घेणे आवश्यक आहे. फोटो असलेले ओळखपत्र नसल्यास अगर त्याने परीक्षेच्या ओळखपत्रावर फोटो चिकटवून तो साक्षांकित करुन घेतला नसल्यास त्याला परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही याची संबंधित कर्मचाऱ्यांना जाणीव करून द्यावी.

...२...

५. आपल्या कार्यालयामार्फत उमेदवारास परीक्षेस उपस्थित राहण्याची सूचना द्यावी. पूर्व अनुमती न घेता परीक्षेला अनुपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्याची त्या दिवसाची रजा विनावेतन करण्यात यावी.

६. परीक्षेस बसणाऱ्या एखाद्या कर्मचाऱ्याच्या आवेदनपत्रात एखाद्या विभागात सूट असल्याचे नमूद केले असूनही त्याच्या नावापुढे त्याबद्दलचा निर्देश करावयाचे अनावधानाने राहून गेले असल्यास ही बाब कृपया परीक्षेपूर्वी या कार्यालयाच्या त्वरित निर्दशनास आणावी. तसेच आपल्या कार्यालयातील एखाद्या कर्मचाऱ्याचे नाव त्याचे आवेदनपत्र विहित मुदतीत पाठवूनही त्याला प्रवेश दिला नसेल तर अशा कर्मचाऱ्यास संबंधित परीक्षाचालकांना परीक्षा केंद्रावर भेटण्यासंबंधी सूचना द्याव्यात व तसे केल्याचे या कार्यालयास कळवावे. एखाद्या परीक्षार्थ्याच्या नावात अगर कार्यालयाच्या पत्त्यात अगर यादीत काही त्रुटी आढळून आल्यास त्याबाबत परीक्षेपूर्वी या कार्यालयास व संबंधित परीक्षाचालकास तसे लेखी कळवावे.

७. परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांना प्रत्यक्ष परीक्षेस सुरुवात होण्यापूर्वी १५ (पंधरा) मिनिटे अगोदर परीक्षा दालनात प्रवेश देण्यात येईल व परीक्षा झाल्यानंतर किमान अर्धा तास तरी त्याला परीक्षा दालन सोडता येणार नाही.

८. भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी मराठी टंकलेखन परीक्षा ३० शब्द प्रति मिनिट गतीची असते. यापरीक्षेत उत्तीर्ण होण्याकरिता प्रत्येक विभागात ५० टक्के गुण मिळविणे आवश्यक आहे व सूट मिळण्याकरिता त्या विभागात किमान ६० टक्के गुण मिळवावे लागतात. कृपया संबंधित कर्मचाऱ्यांना याची माहिती द्यावी.

९. उमेदवारांसाठी सूचनापत्रांची नमुना प्रत सोबत जोडली आहे. त्याप्रमाणे संबंधित उमेदवारांना त्याची माहिती द्यावी.

१०. भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी मराठी टंकलेखन परीक्षा ही शासनातर्फे घेण्यात येणाऱ्या विभागीय परीक्षेसारखी असल्याने या परीक्षांना उपस्थित राहिलेल्या उमेदवारांचा परीक्षेचा कालावधी हा दोन संधीपुरता कर्तव्यार्थ समजावा. यापरीक्षेसाठी त्यांना प्रवास करावा लागल्यास नियमानुसार पहिल्या दोन संधी साठी त्यांना प्रवास खर्च अनुज्ञेय राहील.

११. कृपया या पत्रास सर्वप्राथम्य द्यावे व यापत्राची पोच द्यावी.

**आपला,**

**( श्री. श. कि. यादव )**
**सहायक भाषा संचालक,**
**भाषा संचालनायल, विभागीय कार्यालय,**
**पुणे.**

**सहपत्रे:**

१. परीक्षाचालक-नि-ज्येष्ठ पर्यवेक्षकाचे नाव, दूरध्वनी क्रमांक, केंद्राचा पत्ता व वेळापत्रक, इत्यादीचे विवरणपत्र.
२. उमेदवारांची यादी. (आसन क्रमांक)
३. ओळखपत्राचा नमुना.
४. उमेदवारांना सूचना पत्राची नमुना प्रत.

भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, पुणे

भाषा संचालनालय - मराठी टंकलेखन परीक्षा

परीक्षा केंद्र :पुणे                                        दिनांक : १४ ऑक्टोबर २०२५

| आसन क्रमांक | उमेदवाराचे नाव | कार्यालयाचे नाव पत्ता | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्रीमती थोपटे पुनम दिलीप | दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय, शिवाजीनगर, जि. पुणे | --- |
| २ | श्रीमती पालवे सुरेखा अनिल | -----//----- | ---- |
| ३ | श्री. तुगावे अशोक मारुती | -----//----- | ---- |
| ४ | श्री. दोडके ज्ञानेश्वर नागोराव | -----//----- | ---- |
| ५ | श्रीमती शेळके तनुजा किरण | -----//-- | ---- |
| ६ | श्रीमती कुटे वैशाली भगवान | -----//----- | ---- |
| ७ | श्रीमती कुंभार सायली राजाराम | -----//----- | -- |
| ८ | श्रीमती कांबळे मिथाली बंडू | -----//-- | -- |
| ९ | श्रीमती गायकवाड रुपाली गंगाधर | -----//--- | --- |
| १० | श्रीमती सोनार सुरभि विजय | ---//---- | -- |
| ११ | श्रीमती तौर नम्रता शिवाजी | ----//---- | --- |
| १२ | श्रीमती तांबोळी हुमा रफीक | दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर जिल्हा न्यायालय, शिवाजी नगर जि. पुणे | --- |
| १३ | श्रीमती जाधव प्रगती प्रसाद | -----//---- | -- |
| १४ | श्रीमती माने श्रुती अमर | -----//---- | ---- |
| १५ | श्रीमती विन्नु नंदिनी मुरलीधर | -----//---- | -- |
| १६ | श्री. पठाण तोफीक हमीद | -----//---- | -- |

----२----

भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, पुणे

भाषा संचालनालय - मराठी टंकलेखन परीक्षा

परीक्षा केंद्र :पुणे दिनांक : १४ ऑक्टोबर २०२५

| आसन क्रमांक | उमेदवाराचे नाव | कार्यालयाचे नाव पत्ता | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १७ | श्रीमती पाठक भारती विष्णूपंत | दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर<br>जिल्हा न्यायालय, शिवाजी नगर जि. पुणे | ------ |
| १८ | श्रीमती बिराजदार शुभांगी महादेव | ------//------ | ------ |
| १९ | श्री. चौधरी तेजस भानुदास | ------//------ | ------ |
| २० | श्री. जाधव प्रसाद धनंजय | सहायक अधीक्षक,<br>प्रथवर्ग न्यायालय, खडकी,<br>छावणी परिषद, जि. पुणे | -- |
| २१ | श्री. राऊत किरण चंद्रकांत | प्रबंधक,<br>कौटुंबिक न्यायालय, सिटी सर्व्हे नं.३४<br>फायनल प्लॉट नं.८१६/१ जिल्हा व सत्र<br>न्यायालय, पुणे च्या जवळ , शिवाजीनगर,<br>जि. पुणे | --- |
| २२ | श्रीमती पंडित तेजल मंगेश | सहा अधीक्षक,<br>दिवाणी व फौजदारी न्यायालय,<br>पिंपरी चिंचवड, महानगरपलिका ,<br>आंकुर्डी जि. पुणे | -- |
| २३ | श्रीमती पांचाळ आश्विनी एकनाथ | ------//--- | --- |
| २४ | श्रीमती बहुरे सारजाबाई सिताराम | ------//--- | --- |
| २५ | श्रीमती पाठे मोना मोहनराव | ------//--- | --- |
| २६ | श्री. राऊत पंचशिला पांडुरंग | प्रथवर्ग न्यादंडाधिकारी,<br>फौजदारी न्यायालय क्र.३ पुणे<br>शिवाजीनगर, जि. पुणे | -- |
| २७ | श्री. कदम दतराम नारायण | ------//--- | ---- |
| २८ | श्री. साबळे राजेंद्र दशरथ | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,<br>लाचलूचपत प्रतिबंधक न्यायालय,<br>शिवाजी नगर जि. पुणे | --- |
| २९ | श्री. खरमाटे नितीन संपतराव | ------//----- | ---- |

भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, पुणे

भाषा संचालनालय - मराठी टंकलेखन परीक्षा

परीक्षा केंद्र :पुणे दिनांक : १४ ऑक्टोबर २०२५

| आसन क्रमांक | उमेदवाराचे नाव | कार्यालयाचे नाव पत्ता | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ३० | श्रीमती कदम अबोली उमेश | दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर<br>दिवाणी न्यायालय, वडगाव, मावळ<br>जि. पुणे | -- |
| ३१ | श्री. ढाणे शुभम अरविंद | -----//---- | --- |
| ३२ | श्री. पावरा सुर्यवंशी रोहिदास | अति. न्यायाधीश,<br>लघुवाद न्यायालय, पुणे | वि-१ मध्ये सुट |
| ३३ | श्री. उपरे उमेश सुर्यकांत | -----//---- | ----- |
| ३४ | श्री. बिराजदार नितेश दिगंबर | -----//---- | ----- |
| ३५ | श्री. चौगुले सोमनाथ हणमंत | -----//---- | ----- |
| ३६ | श्रीमती सितप तेजस्वी शांताराम | -----//---- | ----- |
| ३७ | श्रीमती फरताळे आकांक्षा नामदेव | -----//---- | ----- |
| ३८ | श्रीमती जाधव योगिता प्रमोद | -----//---- | ----- |
| ३९ | श्री. तांगडे शुभम भगवान | -----//---- | ------ |
| ४० | श्री. आवटे बलविर विश्वानाथ | -----//---- | ------ |
| ४१ | श्रीमती सुक्रे सुजाता सत्यवान | -----//---- | ------ |
| ४२ | श्रीमती कुंभार पल्लवी प्रकाश | -----//---- | ------ |
| ४३ | श्रीमती साठे श्रध्दा दिपक | -----//---- | ------ |
| ४४ | श्री. भोकरे आदित्य मुकेश | प्रबंधक,<br>जिल्हा व सत्र न्यायालय,<br>जि. पुणे -४११००५ | --- |
| ४५ | श्री. राऊत विठ्ठल हरिदास | ----//----- | -- |
| ४६ | श्री. कुलकर्णी पंकज अनंतराव | ----//----- | |

भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, पुणे

भाषा संचालनालय - मराठी टंकलेखन परीक्षा

परीक्षा केंद्र :पुणे                                                    दिनांक : १४ ऑक्टोबर २०२५

| आसन क्रमांक | उमेदवाराचे नाव | कार्यालयाचे नाव पत्ता | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ४७ | श्री. बजागे प्रथमेश भिकाजी | प्रबंधक,<br>जिल्हा व सत्र न्यायालय,<br>जि. पुणे -४११००५ | -- |
| ४८ | श्री. दहिवाळ अजय दिलीप | ----//--- | --- |
| ४९ | श्री. मुंडे विक्रम मसाजी | ----//--- | --- |
| ५० | श्रीमती पामु उत्कर्षा मनोहर | ----//--- | --- |
| ५१ | श्री. दिघे रोहित दिनेश | ----//--- | --- |
| ५२ | श्री. झोरे अनिल विष्णू | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर ,<br>दिवाणी न्यायालय, घोडेगांव<br>ता. आंबेगाव जि. पुणे -४१२४०८ | -- |
| ५३ | श्रीमती शिंगाडे कविता बाळू | ----//--- | --- |
| ५४ | श्री. पोपडे गौरव राजाभाऊ | ------//----- | ---- |
| ५५ | श्रीमती ताटे शितल भगवान | दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर<br>दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर<br>मिरज रोड, विजयनगर, जि. सांगली-४१६३१२ | -- |
| ५६ | श्री. कांबळे श्रीधर बळवंत | ------//----- | ---- |
| ५७ | श्रीमती खुडे साधना बाजीराव | ------//----- | ---- |
| ५८ | श्रीमती इंगलजे सुप्रिया संतोष | ------//----- | ---- |
| ५९ | श्रीमती भोसले सुषमा भानुदास<br>( श्रीमती माने सुषमा रविराज ) | ------//----- | ---- |
| ६० | श्री. जाधव विजय बंडू | मुख्य न्यायदंडाधिकारी ,<br>मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय,<br>मिरज रोड, विजयनगर, जि. सांगली | -- |
| ६१ | श्री. पांचाळ विजय मधुकर | प्रशासकीय सदस्य,<br>औद्योगिक न्यायालय , सातारा<br>प्लॉट क्र.५२४/१/ अ, सदर बझार<br>जि. सातारा -४१६३१२ | वि-१ मध्ये सूट |

भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, पुणे

भाषा संचालनालय - मराठी टंकलेखन परीक्षा

परीक्षा केंद्र : पुणे  दिनांक : १४ ऑक्टोबर २०२५

| आसन क्रमांक | उमेदवाराचे नाव | कार्यालयाचे नाव पत्ता | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ६२ | श्री. गिरी विठ्ठल युवराज | प्रबंधक,<br>जिल्हा व सत्र न्यायालय,<br>जि. पुणे -४११००५ | ---- |
| ६३ | श्रीमती भगत ज्योती समीर | -----//---- | ----- |
| ६४ | श्री.देवरे कृतिका शांताराम | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर ,<br>दिवाणी न्यायाधीश, जुन्नर<br>जि. पुणे | ----- |
| ६५ | श्रीमती कडूसर प्रतिक्षा सुनिल | -----//---- | ---- |
| ६६ | श्रीमती राठोड अश्विनी योगेश | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,<br>जिल्हा व सत्र न्यायालय,<br>जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, कोटनाका ,<br>ठाणे (पश्चिम), ठाणे - ४००६०१. | --- |

(स्वाक्षरी)

सहायक भाषा संचालक,<br>
भाषा संचालनालय,<br>
विभागीय कार्यालय पुणे

**भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी**

**३० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी टंकलेखन परीक्षा १४ ऑक्टोबर २०२५**

**परीक्षेचे वेळापत्रक**

**परीक्षेचा दिनांक : मंगळवार १४ ऑक्टोबर २०२५**

**परीक्षेची वेळ :- सकाळी ०९.३० वाजल्यापासून पुढे**

**(प्रश्नपत्रिका विभाग क्रमांक १ व विभाग क्रमांक २)**

परीक्षाचालक नि ज्येष्ठ पर्यवेक्षकांचे नाव, दूरध्वनी क्रमांक, परीक्षा केंद्राचा पत्ता
इत्यादीची माहिती दर्शविणारे विवरणपत्र

| अ.क्र. | केंद्र | परीक्षा केंद्राचा पूर्ण पत्ता | परीक्षाचालक नि ज्येष्ठ पर्यवेक्षकाचे नाव व कार्यालयाचा पत्ता दूरध्वनी क्रमांक | आसन क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | पुणे | मा.प्राचार्य,<br>नौरोसजी वाडीया महाविद्यालय, आर्टस् इमारत , व्ही. के. जोग पथ, पुणे -४११००१ | श्री. श .कि. यादव<br>विभागीय सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय, नवीन मध्यवर्ती इमारत, २ रा मजला, पुणे-४११००१<br>मो. ८३५६०५४७१३ | **यादीतील सर्व उमेदवार** |

@@@@@@@@@@

सहायक भाषा संचालक,
भाषा संचालनालय,
विभागीय कार्यालय, पुणे.

नमुना क्र.०९

भाषा संचालनालय,

मराठी टंकलेखन / मराठी लघुलेखन परीक्षा

# **ओळखपत्र**

छायाचित्र

**श्री./कुमारी /श्रीमती.........................................................................................हे / या शासकीय कर्मचारी असून, खाली दर्शविल्याप्रमाणे त्यांनी आपली सही माझ्या समक्ष केली आहे. भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या मराठी टंकलेखन/लघुलेखन परीक्षेसाठी त्यांचा आसन क्रमांक............................आहे.**

---------------------

**उमेदवाराची स्वाक्षरी**

**(उमेदवाराने आपल्या कार्यालय प्रमुखासमक्ष स्वाक्षरी करावी)**

-------------------------------------

**( कार्यालयाचे नाव आणि कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी**

**उमेदवाराची स्वाक्षरी**

**(परीक्षा केंद्रावर पर्यवेक्षकाच्या समोर स्वाक्षरी करावी )**

**दिनांक:......................**

----------------------

पर्यवेक्षकाची स्वाक्षरी

**महत्त्वाची सूचना:- हे प्रमाणपत्र परीक्षेच्या काळात ज्या ज्या वेळी मागण्यात येईल त्या त्या वेळी दाखल केले पाहिजे .**

**(शा.म.मु.)एच २२६० (५,०००-२-२००३)**

## मराठी टंकलेखनाच्या परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांसाठी विशेष सूचना

१. परीक्षेचा कालावधी विभाग १ करिता (वेग परीक्षा) १० मिनिटांचा राहील. मध्यंतर १५ मिनिटांचा राहील व विभाग २ करिता परीक्षेचा कालावधी ६० मिनिटांचा राहील.

२. टंकलेखन परीक्षा संगणकावर घेतली जाईल. संगणकावर A-४ साईज पेपरवर पेज सेटअप टॉप मार्जिल ०.७", बॉटम मार्जिन ०.५", लेफ्ट मार्जिन १.५", राईट मार्जिन ०.७" असे करावे. दोन ओळींमधील अंतर १.५ लाईन ठेवावे व फॉन्ट साईज १२ वापरावी.

३. परिच्छेदाच्या सुरुवातीस पाच कळ (स्पेस) अंतर इतकी जागा सोडावी. पूर्णविराम, द्विबिंदूचिन्ह, उदगारवाचक वा प्रश्नार्थ चिन्ह दिल्यानंतर दोन कळ (स्पेस) अंतर इतकी जागा सोडावी. इतर विराम चिन्हानंतर एक कळ (स्पेस) अंतर इतकी जागा सोडावी.

४. एखादा चुकीचा शब्द डिलीट करून सुधारल्यास ती चूक समजली जाणर नाही.

५.खालील तक्त्याप्रमाणे चुका मोजल्या जातील.

६. नीटनेटकेपणा आणि योग्य अंतरक्षेपण यासाठी गुण राखून ठेवण्यात आले आहेत.

७. उमेदवारांनी आपापले टंकलिखित कागद त्यांना देण्यात आलेल्या आवरण पृष्ठाबरोबर जोडावे.

८. अभ्यासक्रमातील २ विभागांची स्वतंत्र परीक्षा घेतली जाईल.प्रत्येक विभागात उमेदवाराने स्वतंत्रपणे उत्तीर्ण होणे आवश्वक आहे.

९. उमेदवारांनी संगणकावर टंकलिखित केलेल्या उत्तरपत्रिकेच्या वरच्या बाजूस प्रत्येक पानावर (प्रिंटवर) आसन क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. अन्यथा आसन क्रमांक नसलेली उत्तरपत्रिका तपासली जाणार नाही.

### चुका दर्शविणारा तक्ता.

| अ.क्र. | चुकांचा प्रकार | चुकांची संख्या |
|---|---|---|
| १. | कागदाच्या डाव्या बाजूला समास न सोडणे. (समास न सोडलेल्या प्रत्येक ओळीसाठी गुण कमी करण्यात येतील) | १/२ |
| २. | मुळातील परिच्छेद रचनेत बदल करणे. | १ |
| ३. | शब्द, वर्ण व विराम चिन्हे यामधील अंतर गाळणे अगर त्यामध्ये अनियमित अंतर सोडणे. | १/२ |
| ४. | दोन ओळीत अनियमित अंतर सोडणे. (कधी खटक्याचे (Enter) अंतर तर कधी त्यापेक्षा अधिक खटक्याचे (Enter) अंतर सोडणे.), विराम चिन्हे, कंस, अवतरण चिन्हे वगैरे गाळणे. (टीप : संगणक यंत्रामध्ये जर विराम चिन्हे अगर इतर चिन्हे नसतील तर चुका मोजल्या जाणार नाहीत.) | १ |
| ५. | अर्धाक्षर पूर्ण करण्याकरिता उजव्या कान्याच वापर केल्यास, तसेच विरामचिन्हे, कंस, अवतरणचिन्हे वगैरेचा चुकीचा वापर. | १/२ |
| ६. | अशुध्द लेखन (यात शब्दातील वर्णाचा विपर्यय अथवा स्थानबद्दल व शब्दातील वर्णाचा लोप यांचाही समावेश होतो.) | १ |
| ७. | मूळ मजकुरातल शब्द व संख्या गाळणे. (अशा प्रत्येक शब्द अगर संख्येच्या वेळीही एक चूक समजण्यात येईल.) | १ |
| ८. | मुळात नसलेला शब्द अगर संख्या टंकलिखित करणे. | १ |
| ९. | पुनरावृत्ती. (प्रत्येक शब्द, संख्या अगर ओळ यामागे एक चूक समजण्यात येईल.) | १ |
| १०. | शब्द अयोग्यरित्या सोडणे. | १/२ |

**टीप :** दिलेल्या उताऱ्यात चूक आढळल्यास ती दुरुस्त करुन टंकलेखन केले अगर तसे न करता आहे तसेच टंकलेखन केले तरी ती चूक मोजण्यात येणार नाही.